# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. १७१-२३** **दिनांक :- २९/०५/२०२३**

## खुनाच्या गुन्हयाची ०६ तासांत उकल करण्यास वालीव पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.

दिनांक २५/५/२०२३ रोजी सायंकाळी ०७:०० वाजताच्या सुमारास अंकीत रामप्रकाश साह याचे बिल्डर श्री. विनोद उपाध्याय यांचे कार्यालयात काम करणारी तरुणी कुमारी स्विटी उर्फ नजमा हिचेसोबत कार्यालयीन कामातुन आकस्मीत वाद उदभवला होता. सदरचा वाद सोडविण्याचा प्रयत्न त्यांचे सोबत काम करणारा ईमामुद्दीन मन्सुरी यांने केला. परंतु सदरचा वाद न मिटता अधिक वाढत गेला. त्यांनतर अंकीत हा ईमामुद्दीन याचे घरासमोर गेला असता त्यांचेत पुन्हा वाद होवून ईमामुद्दीन मन्सुरी व त्याचा मुलगा विधीसंघर्षीत बालक यांनी अंकित रामप्रकाश साह यास शिवगाळी, दमदाटी व लाथाबुक्यानी मारहाण करुन ईमामुद्दीन मन्सुरी व त्याचा मुलगा विधीसंघर्षग्रस्त बालक यांनी अंकीत साह याचे छातीवर, हातावर व पाठीवर कैचीने भोसकुन त्याचा खुन केला. सदरबाबत मयत अंकीत साह याचे नातेवाईकाच्या तक्रारीवरुन वालीव पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. I ४८९/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३०२, ३२३, ५०४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हाचे गांभीर्य लक्षात घेवुन सदर गुन्हा उघड करण करीता वरिष्ठांनी वालीव पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांची स्वतंत्र पथके तयार करुन त्यांना सुचना व मार्गदर्शन केले होते. त्याअनुषंगाने नमुद पथकाने गुप्त बातमीदार व जनसंपर्काच्या माध्यमातुन आरोपीत ईमामुद्दीन मोहम्मद रफिक मन्सुरी व त्याचा मुलगा विधीसंघर्षीत बालक, रा. वाघराळपाडा, वसई पुर्व यांना मुंबई गुजरात राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ०८ वरुन ताब्यात घेतले असुन सदर गुन्हाचा पुढील तपास पो.नि. श्री. राहुलकुमार पाटील, गुन्हे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्रीमती पोर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ- २ वसई, श्री. चंद्रकांत जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त नालासोपारा विभाग अति. कार्यभार तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाील वालीव पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पो.नि. श्री. राहुलकुमार पाटील(गुन्हे), गुन्हे प्रकटिकरण पथकाचे स.पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.उप.नि. अतुल नावले, पो.हवा. मोहन परकाळे, मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, महेश जाधव, रुस्तम राठोड, सतीष गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अंम. अभिजीत गढरी, संतोष गिते यांनी केली आहे.

*******